आर.सी.सी.१०३८/२०२०
निशाणी क्र – १७.

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं.१.ची साक्ष
देवा शपथ खरे सांगेण की,

नाव : नुतन अशोक शिवरकर,
वय : ५२ वर्षे, धंदा : काही नाही,
राहणार : वानवडी, पुणे.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती आम्रपाली कस्तुरे :-**

सन २०१४ मध्ये मी बी-५०२ दयानंद गार्डन वानवडी पुणे येथे राहत होते. त्यावेळी सोसायटी चेअरमन आरोपी क्र.१ होते व सेक्रेटरी आरोपी क्र.२ होते. सन २०१४ मध्ये सोसायटीच्या सार्वजनिक कल्बमध्ये कोजागिरीचा कार्यक्रम होता. त्या ठिकाणी बसले होते व माझ्या शेजारी आरोपी क्र.२ येऊन बसले व मला म्हणाले की, तुम्ही खुप सुंदर दिसता, मला तुमच्याशी दोस्ती करायची आहे. त्यामुळे मला लज्ञा उत्पन्न झाली व मी तेथून उठून दुसरीकडे बसले. मी आरोपी क्र.२ ला समज दिली. परंतु आरोपी क्र.२ ने आपल्या पदाचा गैरवापर करुन मला वेळोवेळी सोसायटीच्या ऑफीसमध्ये बोलावायचे व अश्लील हावभाव करायचे व बोलायचे. आपल्या पदाचा गैरवापर करुन आरोपी क्र.२ ने सन २०१४ ते सन २०१९ याकालावधीमध्ये मला त्रास दिला. सदर सोसायटीमध्ये माझी सदनिका असून ती माझ्या व माझ्या पतीच्या नावावर आहे. आरोपी क्र.१ व २ हे केवळ मलाच जाणून बूजून त्रास देत होते व नोटीस पाठवित होते. ती नोटीस माझ्या नावे येत होती.

२. दि.२०.०६.२०१९ रोजी मी इंटरनेटचे कनेक्शन घेतले होते. तसेच कोव्हीडचे सर्व नियम पाळले होते. त्याकरीता मी आरोपी क्र.१ ला फोन केला होता. परंतु त्यांनी माझा फोन घेतला नाही. त्यानंतर मी आरोपी क्र.२ ला फोन केला. परंतु त्यांनी तुम्ही आता कनेक्शन घेऊ शकत नाही. परंतु त्यांनी मी फोन केला त्याच्या आदल्या दिवसापर्यत १८ इंटरनेट कनेक्शन दिले होते. मी सोसायटीला इंटरनेट कनेक्शन करीता रितसर अर्ज केला होता. त्यानंतर मी कनेक्शन घेतले. आरोपी क्र.१ व २ यांनी सोसायटीच्या मायगेट अॅपवर तसेच सोसायटीच्या नोटीस बोर्डवर माझे नावे नोटीस लावली की, मी दादागिरी करुन इंटरनेट कनेक्शन घेतले आहे. ती नोटीस आल्यानंतर मी आरोपींना आपण एका सोसायटीमध्ये राहतो

अशी समज दिली. दि.२२.०६.२०१९ रोजी व मी वानवडी पोलीस ठाण्यात आरोपींविरुध्द तक्रार दिली. त्यानंतर मी सोसायटीमध्ये सन २०२२ मध्ये धनादेश देण्यासाठी गेले होते. त्यावेळी तेथे मॅनेजर तुषार जाधव होते. त्यांनी सांगितले की, त्यांना आरोपी क्र.१ ने धनादेश घरी आणुन देण्यासाठी सांगितला व मी तो घेऊ शकत नाही. तो धनादेश मी सोसायटीच्या लेटरबॉक्समध्ये टाकला. धनादेशाचा विषय तेथेच संपला. सोसायटीचे सुरक्षा रक्षक नाना होते व ते मला म्हणाले की, आरोपी क्र.१ व २ येता जाता तुमची चौकशी करतात तुम्ही कधी आले व कधी गेले. एक दिवस मी सोसायटीमध्ये संध्याकाळी ०६.३० ते ०६.४५ चे दरम्यान वार्कींग करीत होते. त्यावेळी आरोपी क्र.१ तिकडे उभे होते. ते मला म्हणाले मी तुमच्यासोबत वार्कींगला येऊ का तसेच तुम्ही खूप सुंदर दिसता व माझी बायको तुमच्या सारखी नाही. तसेच त्यांनी देखेगे भी और दिखायेगे भी अशी शेरो शायरी केली. त्यावरुन मला आरोपी क्र.१ चा हेतू कळाला. त्या वाक्यामुळे लज्जास्पद वाटले. ती घटना मी माझ्या मुलीला सांगितली. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. आता मला तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे . त्याला नि.क्र.१८ देण्यात येते. आता मला छापील एफआयआर दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.क्र.१९ देण्यात येते. आता मला दि.१४.०६.२०२० व दि.२०.०९.२०२० च्या नोटीस दाखविण्यात आल्या. सदर नोटीसीवर चेअरमन, सेक्रेटरी व माझी सही आहे. त्याला ओळखीकरीता नि.क्र.२० व २१ देण्यात येते. आरोपी क्र.१ व २ आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री यु.एल.निबांळकर यांचेमार्फत -</u>**

आरोपी क्र.२ हे त्यांची पत्नी व दोन मुलांसोबत सोसायटीमधील ए-विंगमधील त्यांचे सदनिकेत राहतात. आरोपी क्र.२ यांची पत्नी गृहिणी किंवा नोकरी करते यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.२ यांची पत्नी कोण आहे यांची मला माहिती आहे. माझे आरोपी क्र.२ च्या पत्नीसोबत सोसायटीच्या आवारात भेटल्यानंतर बोलणे होते नसे. आरोपी क्र.२ चे आई-वडील आरोपी क्र.२ चे घरी येत जात होते अगर कसे यांची मला माहिती नाही. साक्षीदार सांगते की, आरोपी क्र.२ चे वडीलांचे निधन झालेले आहे. आरोपी क्र.२ ची पत्नी शिकवणी घेते अगर कसे यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.२ नोकरी करतात अगर कसे यांची मला

माहिती नाही.

२.    आरोपी क्र.१ सेवानिवृत झाले आहेत यांची मला ऐकीव माहिती आहे. आरोपी क्र.१ सेवानिवृत्त झाल्यानंतर कायमस्वरुपी सोसायटीमध्ये राहायला आले अगर कसे यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.१ बॅंकेत नोकरीला होते अगर कसे यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.१ सोबत त्यांची पत्नी राहते. आरोपी क्र.१ ला किती मुले आहेत यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.१ यांची मुले बाहेर देशात असतात व आरोपी क्र.१ त्यांच्याकडे जातात ही माहिती न्यायालयात आल्यांनतर समजली. सन २०१७ साली आरोपी क्र.१ यांच्या सेवानिवृतीचा कार्यक्रम झाला होतो अगर कसे यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.१ यांच्या पत्नीला मी ओळखते. आरोपी क्र.१ ची पत्नी सोसायटीमधील महिलांच्या कार्यक्रमांना येत होत्या. आरोपी क्र.१ व २ हे मुळचे वानवडी येथील रहिवासी नाहीत अगर कसे यांची मला माहिती नाही.

३.    मी दहावी पास आहे. मी भवानी पेठ पुणे येथे शिक्षणासाठी राहत होते. माझे पहिले ते दहावीपर्यतचे शिक्षण भवानी पेठ पुणे येथे झाले. माझे लग्न सन १९८९ साली झाले. **(आरोपीतर्फे वकीलांनी प्रश्न विचारला की, साक्षीदाराचे सासर वानवडी येथील आहे. सदर प्रश्नाला अभियोग पक्षातर्फे हरकत घेण्यात आली की, घटनेशी या प्रश्नांचा संबंध नाही. त्याबाबत आरोपीतर्फे वकीलांना विचाराणा केली असता, त्यांनी मी सदर प्रश्न का विचारण्यात येत आहे हे मी डिफेन्स ओपन होईल म्हणून मी सांगू शकत नाही व लेखी स्वरुपात देऊ शकतो असे सांगितले. परंतु भारतीय पुरवा कायदा १८७२ मध्ये अशी कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे सदरचा लेखी युक्तीवाद ग्राहय नाही व खारीज करण्यात येतो.)** माझे सासर मुळ वानवडी येथील रहिवासी आहे.

४.    माझ्याकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे महिला शहर उपाअध्यक्ष हे पद होते. त्याचप्रमाणे इकबाल शेख यांच्याकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अल्पसांख्याखकचे पुणे शहर अध्यक्ष हे पद होते. माझी इकबाल शेख यांच्यासोबत राजकारणामुळे ओळख झाली. मी महिलांसाठी चांगले कामे करते म्हणून मला महिला शहर उपाअध्यक्ष हे पद देण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे महिलांच्या प्रश्नासंदर्भात माझे सरकारी कार्यालय व पोलीस ठाण्यात येणे

जाणे होते. हे म्हणणे खरे आहे की, मी महिलांचे कौटुंबिक वाद विवाद मिटवीत होते. हे म्हणणे खरे आहे की, वानवडी भागातील बाळासाहेब शिवरकर हे नगरसेवक, आमदार व मंत्री होते. बाळासाहेब शिवरकर हे मला ओळखतात. सोसायटीमधील सदस्य व महिला मी राजकारणात असल्यामुळे माझ्याकडे समस्या घेऊन येत असत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या व्यस्त कामामुळे मला सोसायटीतीतील कार्यक्रमांना वेळ देणे शक्य होते. साक्षीदार स्वताःहुन सांगते मी सवडीनुसार कार्यक्रमाला जात होते.

५. हे म्हणणे खरे आहे की, सोसायटीमध्ये स्वतंत्र सांस्कृतिक समिती आहे. त्या समितीकडे सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन खर्च इत्यादीची माहिती असेल. हे म्हणणे खरे आहे की, सोसायटीच्या कार्यक्रमामध्ये अनेक व्यक्ती त्यांच्या मोबाईलमध्ये कार्याक्रमांचे फोटो घेत असतात. बी-विंगमधील महिला माझ्या मैत्रीणी नाहीत. सोसायटीमधील माझ्या ओळखीच्या महिलासोबत माझे चांगले संबंध आहेत. सोसायटीतील कार्यक्रमांसाठी ज्या माहिला येतात त्यातील माझ्या ओळखीच्या महिला माझेसोबत गप्पा मारतात व मी एकत्रात कार्यक्रमाला हजेरी लावते. हे म्हणणे खरे आहे की, सोसायटीमधील कार्यक्रमांना संभासदाचे कुटूंबिय येत असतात. सोसायटीच्या कार्यक्रमांना महिला व पुरुषांना बसण्यासाठी व्यवस्था करावी लागते. पावसामुळे अगर कोव्हीडच्या काळात सोसायटीचे कार्यक्रम रद्द करावे लागत होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१४ मध्ये आमच्या सोसायटीत कार्यक्रम झाले नव्हते.

**उटलतपास तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यत तहकूब करण्यात येत आहे.**

समक्ष,

सही/-
(अ.अ.कुलकर्णी)
२रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.

दिनांक : २३/१२/२०२४.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री यु.एल.निबांळकर यांचेमार्फत -</u>**

६. मी सन २००३ पासून दयानंद सोसायटी येथे राहत आहे. सन २००३ ते सन २०१६ पर्यत दयानंद सोसायटीमध्ये दुसरी कमिटी होती अगर कसे यांची मला माहिती नाही. सोसायटीच्या समितीचे पदाधिकारी सोसायटीच्या कार्यालयात असतात अगर कसे यांची मला माहिती नाही. सोसायटीच्या कार्यालयात कामकाज चालते अगर कसे यांची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सोसायटीच्या बाजूला बाग आहे, तसेच सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सदनिकेच्या संदर्भात काही थकीत असल्यास मी सोसायटीच्या कार्यालयात जाते. आता मला नि.क्र.१९ अनुक्र.१ कडील दि.३०.०९.२०१३ रोजीचे पत्र दाखविण्यात आले. सदरचे पत्र माझे हस्ताक्षरातील आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.३०.०९.२०१३ रोजी मी सोसायटीच्या कार्यकरणीमध्ये ओबीसी जागेसाठी नेमणूक करण्यात यावी म्हणून अर्ज केला होता. माझ्या सदनिकेचे पहिले नाव माझ्या पतीचे नावे आहे. माझ्या पतीने माझ्या सदस्यत्वासाठी नाहरकत दिले होते अगर कसे ते मला आठवत नाही. मी सोसायटीची सभांसद झाली होती. मी सहा महिन्याकरीता सभांसद होते. मी सहा महिन्याकरीता कमिटीमध्ये होते. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्यावेळी कमिटीमध्ये होते त्यावेळी सोसायटीच्या चेअरमन निता धुरकर या होत्या. सचिव म्हणून फर्नाडीस कदाचित असू शकतील. साक्षीदार सांगते डिसल्हा किंवा फर्नाडीस याचे पैकी कोणीतरी सचिव असेल. सोसायटीची निवडणूक २०१६ साली झाली अगर कसे ते मला आठवत नाही. सोसायटीची कमिटी पाच वर्षासाठी अस्तीतवात असते अगर कसे ते मी सांगू शकत नाही. माझी नेमणूक सोसायटीच्या कमिटीमध्ये किती कालावधीसाठी होती ते मला आठवत नाही. निता धुरकर यांच्या कमिटीचा कालावधी सन २०११ ते सन २०१६ पर्यत होता अगर कसे यांची मला कल्पना नाही. माझ्या पतीने नाहरकत दिली होती अगर कसे ते मला आठवत नाही. आता मला नि.क्र.१९ अनुक्र.३ कडील दि.११.०७.२०१३ रोजीचे पत्र दाखविण्यात आले. सदरचे पत्र मला आले होते अगर ते मला आठवत नाही. मी सोसायटीचे सर्व थकीत देयक कदाचित भरले असतील. आता मला नि.क्र.१९ अनुक्र.२ कडील दि.१३.०६.२०२० रोजीचा कागद दाखविण्यात आला.

**प्रश्न -** सदरचे पत्र अमृतराज यांनी त्यांचे माझ्यासोबत वाद झाले म्हणून दिले होते ?
**उत्तर -** हे साफ खोटे आहे मी अमृतराज यांना ओळखत नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, दि.१३.०६.२०२० रोजी मी जियो कनेक्शन घेण्यासाठी जे लोक बोलावले होते त्यावेळी सोसायटीच्या गेटवर अमृतराज हा सुरक्षा रक्षक होता. हे म्हणणे खरे आहे की, सदनिके संदर्भातील सोयी-सुविधा अगर मेनटेनेन्स याबाबत काही वाद असल्यास त्याचा अर्ज सोसायटीकडे दिल्यास सोसायटीमार्फत त्या सभांसदाशी पत्र व्यवहार केला जातो. घटनेच्यावेळी सदनिकेचे काही रक्कम सोसायटीकडे देणे असल्यास त्याचा व्यवहार मी पाहायचे व कधी वॅाचमनकडे पैसे दयायचे. सोसायटीमध्ये चेक टाकण्यासाठी ड्रॅाप बॅाक्सची सुविधा केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी देयकाचा धनादेश ड्रॅाप बॅाक्स मध्ये टाकते. साक्षीदार स्वताःहुन सांगते की, मी सोसायटीच्या मॅनेजरकडे चेक देते. हे म्हणणे खरे आहे की, तो ड्रॅाप बॅाक्स सोसायटी ऑफिसच्या बाहेर आहे.

८. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा मोबाईल क्रमांक ९०११६७७६३६ वरुन सोसायटीमधील मुले दंगा करतात म्हणून त्यांची तक्रार चेअरमनकडे केली होती. साक्षीदार पुन्हा सांगते की, त्याबाबत मला आठवत नाही.

९. सोसायटीमध्ये एकूण सहा विंग आहेत. सोसायटीच्या बागेमध्ये आतील बाजूस चालण्यासाठी पदपथ आहे व त्याचा हेतू त्यावरुन चालण्यासाठी आहे. हे म्हणणे खरे आहे की, गेटमधून आतमध्ये गेल्यानंतर डाव्या बाजूला ए विंग आहे व उजव्या बाजूला एफ विंग आहे. हे म्हणणे खरे आहे की, सोसायटीचे मुख्य गेट ए व एफ विंगच्या मध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, एकच गेट असल्यामुळे त्या गेटमधून लोकांचे येणे जाणे सरु असते. हे म्हणणे खरे आहे की, सोसायटीच्या गेटवर सुरक्षा रक्षक असतो व तो चोवीस तास असतो. हे म्हणणे खरे आहे की, गेटसमोरील ए व एफ या इमारतीवर सीसीटीव्ही आहेत. गेटमधून आतमध्ये गेल्यानंतर डाव्या व उजव्या बाजूचे अंतर पंधरा - पंधरा फुट आहे अगर कसे ते मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, इतर वेळेपैक्षा गेटवर सकाळी व संध्याकाळी गर्दी जास्त असते. संध्याकाळी पाच नंतर सोसायटीमधील ऑफीसला गेलेले लोक व शाळेचे विदयार्थी येत असतात अगर कसे यांची मला माहिती नाही.

१०. मी पोलीस ठाण्यात गेल्यानंतर तोंडी सांगणेप्रमाणे पोलीसांनी तक्रार लिहुन घेतली होती. मी लेखी स्वरुपात सदर घटनेबाबत अर्ज केले होते. परंतु ते दि.२८.०९.२०२० रोजी दिले होते अगर कसे ती तारीख मला आठवत नाही. मी दिलेले अर्ज पोलीस ठाण्यात दिले नाहीत ते मी घरी नेले. साक्षीदार पुन्हा सांगते की, ते अर्ज मी पोलीस ठाण्यात दिले अगर घरी नेले त्याबाबत आठवत नाही. नि.क्र.१८ कडील फिर्यादी जबाबामध्ये नमुद 'दि.२८.०९.२०२० रोजी मी दिलेल्या अर्जामध्ये नमुद केल्याच्या अनुषंगाने सांगते की', हे वाक्य बरोबर आहे. मी अर्ज लिहल्यापासून ते पोलीस ठाण्यात तो देईपर्यत सकाळाचे १०.०० वाजले असतील अगर कसे ते मला आठवत नाही. मी दि.२८.०९.२०२० रोजीचा अर्ज सकाळी १०.०० वाजता पोलीस ठाण्यात दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.०९.२०२० च्या अर्जातील मजकूर व फिर्यादी जबाबातील मजकूर वेगळा आहे. दि.२८.०९.२०२० रोजीच्या अर्जाची पोहच मी पोलीसांकडून घेतली होती अगर कसे ते मला आठवत नाही. मी मागील तारखेस दि.२८.०९.२०२० रोजीच्या अर्जाची प्रत आणण्यासाठी घरी गेले होते. परंतु ती प्रत मला मिळाली नाही. साक्षीदार सांगते की, ती प्रत मी अजुनही शोधण्याचा प्रयत्न करत आहे. दि.२८.०९.२०२० रोजीचा मुळ अर्ज पोलीस ठाण्यात दिला असेल किंवा नसेल.

११. हे म्हणणे खरे आहे की, सोसायटीच्या गेटवरील सुरक्षा रक्षक येणा-या जाणा-यांच्या नोंदी माय गेट या अॅपवर ठेवतात. सोसायटीमध्ये येणा-या नातेवाईकांच्या वाहनांचे क्रमांक माय गेट अॅपवर नोंदविले जातात अगर कसे यांची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटना कोव्हीड काळातील असल्यामुळे सुरक्षा रक्षक बाहेरुन येणा-या व्यक्तीला सॅनीटाईज केल्यावर व मास्क लावल्याशिवाय प्रवेश देत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी जियो कंपनीचे इंटरनेट कनेक्शन बसविण्यासाठी कामगार आले होते त्यांना सुरक्षा रक्षक अमृतराज यांने अडविले होते. हे म्हणणे खरे नाही की, गेटवर आल्यानंतर कामगारांनी मला कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या सोसायटीमध्ये एअरटेलचे कनेक्शन आहे. हे म्हणणे खरे आहे की, घरामध्ये नेट कनेक्शन बसविण्यापुर्वी सोसायटीमध्ये राउटर बसवावा लागतो. सोसायटीमध्ये राउटर बसविण्यापुर्वी सोसायटीकडून वर्क ऑर्डर घ्यावी लागते. जियो कंपनीचे कनेकशन बसविण्यासाठी सोसायटीमध्ये येणारी मुले

सोसायटीमधील महिला व मुलीसोबत गैरवर्तन करतात अशी तक्रार एफ विंगमधील रमेश चौटालिया यांनी सोसायटीकडे केली होती अगर कसे यांची मला माहिती नाही. सोसायटीच्या टेरेसचा गैरवापर होवू नये म्हणून टेरेसचे गेट बंद ठेवण्यात आले होते अगर कसे यांची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, टेरेसच्या चाव्या सोसायटीकडे असतात. साक्षीदार सांगते त्या चाव्या वॉचमनकडे असतात. त्या चाव्या वॉचमनकडे सोसायटीनेच दिल्या असतील. हे म्हणणे खरे आहे की, वॉचमनकडे टेरेसेच्या चाव्या घेण्यापुर्वी सोसायटी परवानगी घ्यावी लागते. हे म्हणणे खरे नाही की, मी सोसायटीची परवानगी घेतली नसल्यामुळे वॉचमने टेरेसच्या चाव्या मला दिल्या नव्हत्या. माझे सुरक्षा रक्षकासोबत चाव्या देण्यावरुन अगर कनेक्शनसाठी आलेल्या लोकांवरुन वाद झाले असे घडले नाही.

१२. दि.१४.०६.२०२० व दि.२०.०९.२०२० रोजी मला सोसायटीने पाठविलेल्या नोटीसीला मी उत्तर दिले नाही. मी उत्तर दिले असेल तर ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोव्हीडच्या काळात जियो कनेक्शनचे कामगारांनी योग्य ती काळजी घेतली नसल्यामुळे सुरक्षा रक्षकांनी त्यांना प्रवेश दिला नाही ही वस्तूस्थीती खरी असल्यामुळे मी सदर नोटीसीनी उत्तर दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सोसायटीच्या नियमांचे उल्लखंन केल्यामुळे माझेवर पुढील कारवाई होवू नये म्हणून सेक्रेटरी व चेअरमन यांचेवर दबाव आणण्यासाठी मी प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे.

१३. दि.०२.१०.२०२० रोजीचा माझा फिर्यादी जबाब पोलीसांनी नोंदविला आहे. मी फिर्यादी जबाब वाचून पाहिला होता व तो माझ्या सांगणेप्रमाणे लिहला आहे. माझ्या जबाबामध्ये काही चुका नाहीत. फिर्यादी जबाबातील नमुद 'समक्ष वानवडी पोलीस स्टेशन येथे स्थानीक अर्ज क्र.५४२/२०२० चे चौकशी कामी हजर असतांना जबाब देते की, दि.२८.०९.२०२० रोजीचा अर्ज मी आरोपीविरुध्द मला होणा-या मानसिक त्रासाबद्दल केला होता’ हे वाक्य माझ्या सांगणेप्रमाणे लिहले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.२८.०९.२०२० रोजीच्या अर्जामध्ये नमुद मला जो मानसिक त्रास झाला तो त्रास नि.क्र.२० व २१ कडील नोटीसांमुळे झाला हे नमुद केले आहे.

**उटलतपास तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यत तहकूब करण्यात येत आहे.**

समक्ष,

सही/-

(अ.अ.कुलकर्णी)

२रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

लष्कर न्यायालय, पुणे.

दिनांक : २२/०१/२०२५.